Maharashtra State Board of open Schooling
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे, स.नं.८३२-ए, फा.प्लॉट नं.१७८, व १७९ बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 Fax : 25665807 I
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./मु.वि.मं./1374
पुणे – ४११००४
दि.26/३/२०२६

प्रति,
१. विभागीय सचिव
सर्व विभागीय मंडळे
२.केंद्र समन्वयक/ मुख्यध्यापक,
संबंधित संपर्क केंद्रशाळा

विषय- इयत्ता ५ वी व ८ वी मध्ये प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांसाठी मूल्यमापन सत्राचे आयोजनाबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सन २०२५-२०२६ या कालावधीत इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे अंतिम मूल्यमापन करण्यासाठी आवेदनपत्र दि. ०५/०४/२०२६ ते १३/०४/२०२६ या कालावधीत ऑनलाईन भरून घेण्यात यावेत. सदर विद्यार्थ्यांचे मंडळाच्या http://msbos.mh-ssc.ac.in या संकेतस्थळावरून दि. १०/०४/२०२६ पासून ऑनलाईन प्रवेशपत्र (Admission Card) अपलोड करण्यात येणार असून त्यांनी प्रवेशपत्र डाउनलोड करून घ्यावेत.

त्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांचे संपर्क केंद्रामार्फत मूल्यमापन सत्राचे आयोजन करून दि. १५/०४/२०२६ ते २५/०४/२०२६ या कालावधीत मूल्यमापन परीक्षा घेण्यात यावी.

सोबतच्या परिपत्रकातील सूचनांनुसार आपल्या संपर्क केंद्रावरील विद्यार्थ्यांचे निर्धारित मुदतीत मूल्यमापन सत्राचे नियोजन करण्यात यावे. विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी. तसेच अंतिम निकाल सोबत जोडलेल्या नमुना मूल्यमापन तक्त्यात दि.३०/०४/२०२६ पर्यंत विभागीय मंडळाकडे पाठविण्यात यावा व त्यासोबत परीक्षा शुल्क भरल्याची पावतीची प्रत जोडण्यात यावी.

(डॉ.दिपक माळी)
सचिव
महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी-
विभागीय सचिव, सर्व विभागीय मंडळे यांना कळविण्यात येते की, आपल्या विभागातील संबंधित संपर्क केंद्रावर मूल्यमापन सत्राचे आयोजन करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

जा.क्र./पुविमं/मु.वि./2833
पुणे–411005
दि.30/03/2026

प्रति,
**केंद्र समन्वयक/मुख्याध्यापक,**
मुक्त विद्यालय संपर्क केंद्र शाळा,
पुणे/अहिल्यानगर/सोलापूर

उपरोक्त प्राप्त संदर्भिय पत्रान्वये मुक्त विद्यालय इयत्ता 5 वी आणि इयत्ता 8 वी सन 2025–2026 साठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांसाठी उपरोक्त पत्रात नमुद केल्याप्रमाणे उचित कार्यवाही करण्यात यावी. तसेच याबाबतच्या सूचना सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालक यांना निदर्शनास आणून देण्यात यावी.

(मीनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,(प्र)
पुणे विभागीय मंडळ, पुणे.

mukt19

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे-०४

## परिपत्रक

महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या इयत्ता ५ वी व ८ वी मध्ये प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांसाठी मूल्यमापन आवेदनपत्र भरणे व मूल्यमापन कार्यपद्धती इ. तपशील खालीलप्रमाणे

## मूल्यमापन आवेदनपत्र भरण्यासाठी सूचना

१. मुक्त विद्यालय मंडळाच्या मूल्यमापन प्रक्रियेचे आवेदनपत्रे भरण्यासाठीचा कालावधी दि.०५/०४/२०२६ ते १३/०४/२०२६ असा असेल. आवेदनपत्रे सादर करण्यासाठी कोणत्याही प्रकारची मुदतवाढ दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

२. उमेदवाराने आपले मूल्यमापन आवेदनपत्र संपर्क केंद्रावरून ऑनलाईन पद्धतीने विहित शुल्कासह विहित मुदतीत भरणे आवश्यक आहे.

३. संपर्क केंद्रशाळेने सर्व विद्यार्थ्यांचे मूल्यमापन शुल्क व प्रात्यक्षिक शुल्क चलनाद्वारे सोबत दिलेल्या निर्देशानुसार भरावे व त्याची रीतसर पावती घ्यावी. मूल्यमापन शुल्क पुढीलप्रमाणे असेल.

अ) मूल्यमापन शुल्क रु.१००/- प्रति विषय

आ) प्रात्यक्षिक शुल्क रु.२५/- प्रति विषय (फक्त कला विषय व NSQF विषयासाठी)

इ) प्रमाणपत्र शुल्क रु.१०/-

४. मूल्यमापन आवेदनपत्रे भरण्यासाठीच्या तांत्रिक सूचना-

अ) मुक्त विद्यालय मंडळाच्या http://msbos.mh-ssc.ac.in या संकेतस्थळावर क्लिक करून उमेदवाराने संपर्क केंद्रावरून ऑनलाईन पद्धतीने मूल्यमापन आवेदनपत्र भरावयाचे आहे.

ब) संपर्क केंद्राने आपले संपर्क केंद्र क्रमांक (उदा.M111001) टाकून Login करावे. (आवेदनपत्र भरण्याबाबतच्या सूचना वेबसाईटवर देण्यात आलेल्या आहेत त्यांचे काळजीपूर्वक वाचन करावे.)

क) उमेदवाराचा प्रवेशपत्र अर्ज क्रमांक/ नावनोंदणी प्रमाणपत्र क्रमांक टाकल्यानंतर उपलब्ध होणारी प्राथमिक माहितीची पडताळणी करून आवश्यकता असल्यास त्यामध्ये दुरुस्ती करून घ्यावी. उमेदवारास माध्यम व विषयांच्या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही.त्यामध्ये बदल करावयाचा असल्यास संपर्क केंद्राने उमेदवाराच्या विनंती अर्जासह व शिफारशीसह विभागीय मंडळामार्फत मुक्त विद्यालय मंडळास विहित पद्धतीने प्रस्ताव सादर करावा.

ड) संपर्क केंद्राने उमेदवाराकडून विषयनिहाय मूल्यमापन शुल्क, प्रात्यक्षिक शुल्क व प्रमाणपत्र शुल्क घेऊन रीतसर पावतीघ्यावी.

इ) आपल्या संपर्क केंद्रावरील सर्व उमेदवारांचे मूल्यमापन आवेदनपत्र (संपूर्ण व अचूक माहिती भरलेले आवेदनपत्रे) दाखल करून एकत्रित मूल्यमापन शुल्काची पावती घेऊन एकत्रित शुल्क सोबत दिलेल्या बँक खात्यामध्ये रोखीने/ऑनलाईन/नेटबँक/NEFT/RTGS द्वारे जमा करण्यात यावी.

फ) विहित शुल्क जमा झाल्याची खातरजमा झाल्यानंतरच मंडळामार्फत मूल्यमापन प्रक्रियेची पुढील कार्यवाही करण्यात येईल. उदा.आवेदनपत्र छाननी,प्रवेशपत्र देणे इ.

५. सदरचे शुल्क भरण्यासाठी बँक खात्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| **Name of A/C** | **MAHARASHTRA RAJYA MUKT VIDYALAY MANDAL** |
| **Bank Name** | **HDFC Bank** |
| **Branch Name** | **Bhandarkar Road, Pune-411004** |
| **A/C No.** | **50200036019989** |
| **IFSC Code No.** | **HDFC0000007** |

६. मूल्यमापन प्रक्रियेचे आवेदनपत्र भरल्यानंतर उमेदवारास मूल्यमापन प्रवेशपत्र संपर्क केंद्रामार्फत उपलब्ध करून देण्यात येतील.

## मूल्यमापन

**अ) प्राथमिक स्तर (इयत्ता ५ वी समकक्ष ) / उच्च प्राथमिक स्तर – (इयत्ता ८ वी समकक्ष)**

१. नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन दि. १५/०४/२०२६ ते २५/०४/२०२६ या कालावधीत करण्यात येईल.

२. मूल्यमापन योजना मुक्त विद्यालय मंडळाने वेळोवेळी निश्चित केलेल्या धोरणानुसार राहील. तसेच इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी साठी शासन निर्णय दि. २०/०८/२०१० नुसार सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (C.C.E.) पद्धती लागू राहील.

३. **मूल्यमापन आराखडा-**

अ) इयत्ता ५ वी- भाषा, गणित,परिसर अभ्यास

ब) इयत्ता ८ वी- भाषा, गणित, विज्ञान, इतिहास-ना.शास्त्र, भूगोल

| इयत्ता | आकारिक मूल्यमापन | संकलित मूल्यमापन |
|---|---|---|
| पाचवी | ५० | ५० |
| आठवी | ४० | ६० |

४. NSQF विषयांचे मूल्यमापन ३० गुण लेखी व ७० गुण प्रात्यक्षिक असे राहील. संबंधित विषयांचे मूल्यमापन मंडळ निर्देशानुसार अतिथी निदेशकांमार्फत करण्यात येईल.

५. कला विषय गटातील विषयांना लेखी परीक्षा ५० गुणांची व प्रात्यक्षिक परीक्षा ५० गुणांची राहील. संबंधित विषयांचे मूल्यमापन मंडळ निर्देशानुसार अतिथी निदेशकांमार्फत करण्यात येईल.

६. विद्यार्थ्यांनी निवडलेल्या विषयांचेच मूल्यमापन करण्यात येईल.

७. सर्व पाच विषयांत किमान अध्ययन क्षमता प्राप्त झाल्यासच प्राथमिक स्तर/ उच्च प्राथमिक स्तर शिक्षण पूर्ण केल्याचे मंडळामार्फत प्रमाणपत्र मिळेल.

८. मूल्यमापनाचे माध्यम उमेदवाराने निवडल्याप्रमाणे मराठी/इंग्रजी/उर्दू राहील.

९. सर्व विषयांच्या मूल्यमापनासाठी एकाच सत्रात प्रविष्ठ होणे बंधनकारक असणार नाही. पाच वर्षातील एकुण नऊ मूल्यमापन सत्रातील हव्या त्या विषयाच्या मूल्यमापनासाठी उमेदवार प्रविष्ठ होऊ शकेल.

१०. सोबतच्या निर्देशानुसार आकारिक व संकलित मूल्यमापनाच्या प्रश्नपत्रिका विहित नमुन्यानुसार संपर्क केंद्र स्तरावरून निर्मिती व संपादित करून घ्याव्यात.

११. मूल्यमापन प्रक्रियेनंतर सोबतच्या तक्त्यानुसार उमेदवारांचे विषयनिहाय श्रेणी नमूद करून विहित मुदतीत मूल्यमापन तक्ता विभागीय मंडळामार्फत पुढील प्रक्रियेसाठी सादर करावा.

अ) मुल्यांकन तक्ता भरण्यासाठीच्या सूचना-

१. संपर्क केंद्र व इयत्तानिहाय प्रत्येक उमेदवारांची त्यांनी निवडलेल्या विषयांच्या नावासह श्रेणीची नोंद करावी.

२. आकारिक व संकलित मूल्यमापनाच्या सर्व नोंदी व अभिलेख स्वतंत्ररित्या संपर्क केंद्र स्तरावर जतन करून ठेवण्यात याव्यात. वेळोवेळी वरिष्ठांच्या भेटी दरम्यान अवलोकनास उपलब्ध करून देण्यात याव्यात.

सचिव

महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे

Scanned with OKEN Scanner

# संमतीपत्र

मी, महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे मार्फत घेण्यात येणाऱ्या प्राथमिक स्तर (इयत्ता ५ वी समकक्ष ) / उच्च प्राथमिक स्तर – (इयत्ता ८ वी समकक्ष) सन २०२६ मधील मूल्यमापन प्रक्रियेसाठी अर्ज करीत आहे. मंडळाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले सर्व नियम व सूचनांचे पालन करण्यास माझी सहमती आहे. त्या संबंधीची विषय योजना मला माहिती असून

१) मी चुकीची विषययोजना निवडल्यास माझी संबंधीत विषयाची संपादणूक रद्द करण्यासंबंधीचा मंडळाचा निर्णय माझ्यावर बंधनकारक असेल.

२) उमेदवारासाठीच्या सर्व सूचना मला ज्ञात असून त्या माझ्यावर बंधनकारक राहतील.

३) मला संपर्क केंद्राकडून मूल्यमापन प्रक्रिया शुल्काची पावती प्राप्त झालेली आहे.

४) मी इतर कोणत्याही मान्यता प्राप्त समकक्ष मंडळाच्या प्राथमिक स्तर (इयत्ता ५ वी समकक्ष ) / उच्च प्राथमिक स्तर – इयत्ता ८ वी समकक्ष) मूल्यमापन प्रक्रियेस प्रविष्ठ होऊन यशस्वी झालेलो नाही.

स्थळ:- दिनांक:- उमेदवाराची स्वाक्षरी

१) उमेदवाराने दिलेल्या माहितीची मी पडताळणी केली असून ती बरोबर असल्याची खात्री करून प्रमाणित करीत आहे.

२) आवेदनपत्र व मूल्यमापन प्रक्रिया शुल्क आणि उमेदवारासाठीच्या सूचनांची माहिती उमेदवाराला दिलेली आहे.

३) महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या नियमानुसार उमेदवार प्राथमिक स्तर (इयत्ता ५ वी समकक्ष ) / उच्च प्राथमिक स्तर – (इयत्ता ८ वी समकक्ष) मूल्यमापन प्रक्रियेस प्रविष्ठ होण्यास पात्र असल्याचे मी प्रमाणित करीत आहे.

संपर्क केंद्र समन्वयक,
संपर्क केंद्रशाळा
(सही व शिक्का )

Scanned with OKEN Scanner

227

## Class 5th

**MAHARASHTRA STATE BOARD OF OPEN SCHOOLING, PUNE Evaluation of April/May 2026 ( Class 5th)**

Divisional Board :

Class – 5th

General/ Divyang Students (Batch 2025-2026)

Centre Name :

Centre Code :

Centre UDISE NO :

District

Taluka

| Sr. No | Seat No | Candidate Name | Application ID | Class | Medium | Sub - 1 | Sub - 2 | Sub - 3 | Sub - 4 | Sub - 5 | Grade |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | | | | |
| 2. | | | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | | | | |

## Class 8th

**MAHARASHTRA STATE BOARD OF OPEN SCHOOLING, PUNE Evaluation of April/May 2026 ( Class 8th)**

Divisional Board :

Class – 8th

General/ Divyang Students (Batch 2025-2026)

Centre Name :

Centre Code :

Centre UDISE NO :

District

Taluka

| Sr. No | Seat No | Candidate Name | Application ID | Class | Medium | Sub - 1 | Sub - 2 | Sub - 3 | Sub - 4 | Sub - 5 | Grade |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | | | | |

Scanned with OKEN Scanner